


किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातंर्गत महापालिका आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांच्याहस्ते शुक्रवारी वसुंधरा गौरव व वसुंधरा मित्र पुरस्कार प्रदान करण्यात आले. याप्रसंगी डावीकडून दिलीप बापट, प्रकाश राव, राणिता चौगुले, भाग्यश्री पाटील, आबा कांबळे, गजानन जोशी, मिलिंद यादव, कृष्णा गावडे, वीरेंद्र चित्राव आणि चंद्रकांत जोशी आदी.

# पर्यावरणसंवर्धनात लोकसहभाग महत्त्वाचा

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

पर्यावरण चळवळीची मोहीम यशस्वी होण्यासाठी त्यामध्ये लोकांचा सहभाग आणि त्यांची सकारात्मक भूमिका या दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. पंचगंगा प्रदूषणमुक्ती मोहीम, रंकाळा स्वच्छता, मूर्तीदान उपक्रम चळवळीला मिळालेल्या यशामध्ये कोल्हापूरच्या स्थानिक नागरिकांचे योगदान मोठे आहे, असे प्रतिपादन महापालिका आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी केले. पाचव्या किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाअंतर्गत देण्यात येणाऱ्या वसुंधरा मित्र पुरस्कार प्रदान सोहळ्यात त्या बोलत होत्या. शाहू स्मारक भवन येथे पुरस्कार वितरण समारंभ झाला.

बिदरी म्हणाल्या, कोल्हापुरात प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करताना माझा कोल्हापूरच्या नागरिकांशी संबंध आला. यामध्ये मला जाणवलेली गोष्ट म्हणजे, कोल्हापुरातील नागरीक पर्यावरणासंदर्भातील कोणताही केवळ प्रश्न घेऊन भांडायला येत नाहीत तर त्याबाबतचे उपायही त्यांच्याकडे असतात. त्यासाठी प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद दृढ आणि मोकळा झाला तर कोल्हापूर पर्यावरण संवर्धन संकल्पनेसाठी अनुकरणीय शहर ठरेल.

**आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांचे मत**

आयुक्त बिदली यांच्या हस्ते मिलिंद यादव, गजानन जोशी यांच्यासह देवराई संस्थेला गौरवण्यात आले. तसेच राणिता चौगुले, आबा कांबळे, उज्ज्वल नागेशकर, भारत पाटील, भाग्यश्री पाटील यांना वसुंधर गौरव पुरस्काराने सन्मानित केले. महोत्सवाच्या निमित्ताने दरवर्षी पर्यावरणसंवर्धनासाठी महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा सन्मान करण्यात येतो.

प्रयत्न छोटा बदल मोठा या ब्रीदवाक्यासह सुरू झालेल्या पाचव्या किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा दुसरा दिवस पोहाळे येथील बौद्धकालीन गुहा परिसरातील निसर्गभ्रमंतीने सुरू झाला. उदय गायकवाड, केदार मुनीश्वर आणि सचिन जिल्हेदार यांनी मार्गदर्शन केले. आज दिवसभरात अरावव्हिंग, ग्रिनी द ग्रेट, टिंबकटू, रिटर्न ऑफ द क्लाउडेड लेपर्ड, हाऊ प्लास्टिक बॉटल्स आर रिसायकल्ड इन टू पॉलिएस्टर, द इलेव्हन्थ अवर, आक्रोश मुळामुठेचा, प्लँटस हे सिनेमे दाखवण्यात आले.

## छायाचित्र व चित्र प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

वसुंधरा महोत्सवाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या शालेय चित्रकला स्पर्धेतील निवडक चित्रांसह छायाचित्रांच्या प्रदर्शनालाही रसिकांनी गर्दी केली. पर्यावरण माझ्या नजरेतून आणि आशेचा किरण हे दोन विषय देण्यात आले होते. या विषयावर आलेल्या छायाचित्रांचे प्रदर्शन महोत्सवस्थळी भरवण्यात आले आहे. २१ सप्टेंबरपर्यंत शाहू स्मारक येथे प्रदर्शन खुले आहे.

## आज निसर्गभ्रमंती

सकाळी सात वाजता कोंडिग्रे (ता. हातगणंगले) येथील गणपत पाटील यांच्या हरितगृहाला भेट देण्यात येणार आहे. या हरितगृहातील भाज्या जगात पाठवल्या जातात.

## सिनेमाप्रदर्शन

दिवसभरात नैसर्गिक स्त्रोतावर बेतलेला द सॉरी ऑफ वेल्लाणी, जैविक इंधन बनवण्याच्या कामावरचा अवनी, खाडीकाठांवरील प्रदेशजीवन दाखवणारा प्रोजेक्ट मॅनग्रुव्हज, वनीकरणावर आधारीत माना व्हिलेज, खाणउद्योगामुळे धोक्यात आलेल्या प्राणीजीवनावर आधारित भट्टी माईन्स, कोकणातील व्यवसायावर आधारित कोकणची मेगा वाट हे सिनेमे दाखवण्यात येणार आहेत.

## व्याख्यान

संगणक व इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या वाढत्या वापरामुळे ई कचऱ्याची समस्याही वाढत आहे. ई कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन कसे करावे याबाबत मनोज मेहता यांचे दुपारी तीन वाजता शाहू स्मारक येथे व्याख्यान होणार आहे.

* दै. महाराष्ट्र टाईम्स :- २०/९/२०१४